॥ विद्या धर्मेण शोभते ॥
गीता परिवार

# ॥ श्रीमद्भगवद्गीता शुद्ध उच्चारण मार्गदर्शिका - स्तर 2 ॥

## वर्ण आणि त्यांचे उच्चार-

- संस्कृत भाषेत वर्ण, त्यांचे उच्चार त्यांची स्थाने यांचा सूक्ष्म पणे विचार करुन ती निश्चित केली गेली आहेत. कोणत्याही वर्णाचा उच्चार करताना तोंडातील विशिष्ट जागेचाच उपयोग करत तो उच्चार केला जातो. उदाहरणार्थ, कंठ, ताळू, मूर्धन्य इ. तोंडातील ज्या स्थानावरून तो वर्ण उच्चारला जातो त्या स्थानाच्या नावावरूनच तो वर्ण ओळखला जातो, जसा गळ्यातून उच्चारला जाणारा क वर्गातील प्रत्येक वर्ण कंठव्य असे मानतात. हे वर्ण व त्याची तोंडातील स्थाने खालील चित्रात दाखवली गेली आहेत.
- स्, श्, आणि ष्, हे वर्ण क्रमशः 'दंतव्य, तालव्य, व मूर्धन्य आहेत. यांचे उच्चार त्याच प्रकारे केले गेले पाहिजेत जसे त्याचा समान असलेल्या वर्गातील वर्णांचे केले जातात.

**# हे लक्षात घ्यावे की, ज्या वर्णाचे जे स्थान आहे, त्याच स्थानाचा उपयोग करुन केलेला उच्चार हाच उचित उच्चार असतो.**

- **अकुहविसर्जनीयानां कण्ठः**
  **कण्ठ** – अ, आ, क् वर्ग, ह्, विसर्ग(:)
- **इचुयशानां तालु**
  **तालु** – इ, ई, च् वर्ग, य्, श्
- **ऋटुरषाणां मूर्धा**
  **मूर्धा** – ऋ, ॠ, ट् वर्ग, र्, ष्
- **लृतुलसानां दन्ताः**
  **दन्त** – लृ, त् वर्ग, ल्, स्
- **उपूपध्मानीयानामोष्ठौ**
  **ओष्ठ** – उ, ऊ, प् वर्ग, उपध्मानीय प*, फ*
- **ऐदैतोः कण्ठतालु**
  **कण्ठ-तालु** – ए, ऐ
- **ओदौतोः कण्ठोष्ठम्**
  **कण्ठ-ओष्ठ** – ओ, औ
- **ञमङणनानां नासिका च**
  **मुख-नासिका** – ङ्, ञ्, ण्, न्, म्
- **वकारस्य दन्तोष्ठम्**
  **दन्त-ओष्ठ** – व्
- **जिह्वामूलीयस्य जिह्वामूलम्**
  **जिह्वामूल** – जिह्वामूलीय क*, ख*
- **नासिकाऽनुस्वारस्य**
  **नासिका** – अनुस्वार(ं)





गीता परिवार चे साहित्य इतर कोणत्याही ठिकाणी वापरण्यासाठी पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

## अवग्रह –

- अवग्रह 'ऽ' हे केवळ एक चिन्ह आहे, ते लुप्त झालेला 'अकारा'(अ) दर्शवते. त्याला स्वतंत्र असा उच्चार नाही. अवग्रह नेहमीच 'ए', 'ओ', किंवा 'आ' या स्वरांच्या नंतरच येतो.

## श्रीमद्भगवद्गीतेत वापरले गेलेले छंद –

- छंदाचे अनेक प्रकार संस्कृत मधे आहेत परंतु श्रीमद्भगवद्गीतेत फक्त खालील दोन छंदांचाच वापर केला गेला आहे. 1) अनुष्टुप व 2) त्रिष्टुप अनुष्टुप छंदात एकूण 32 अक्षरें असतात व प्रत्येक चरणात 8 अक्षरें असतात. त्रिष्टुप छंदात एकूण 44 अक्षरें असतात व प्रत्येक चरणात 11 अक्षरें असतात. या 8 व 11 अक्षरांनंतर प्रत्येक चरणात थांबतात (अवकाश घेतात) याला छंद शास्त्रात **'यति'** असे म्हणतात.

  **# लक्षात घ्या की, संपूर्ण गीतेत पांच जागी अपवादात्मक (11/1, 2/6, 2/29, 8/10, 15/3) काही चरणात ठरलेल्या अक्षरांहून एक अक्षर कमी किंवा अधिक आढळते**

## हलन्त स् काराने सुरु होणाऱ्या शब्दांच्या उच्चारासंबंधी नियम

- कोणत्याही शब्दाची सुरुवात जर हलन्त 'स्' (स्वर रहीत) होत असेल तर हे लक्षात ठेवावे की, त्या अगोदर कोणत्याही स्वराचा उच्चार करु नये. 'स्थान' या शब्दा ऐवजी *'इस्थान'* असा उच्चार केल्यास तो योग्य नाही.

## आघातांच्या नियमांबद्दलची पुढील माहीती

- 'द्' व 'य' यांचे संयुक्ताक्षर द्य आहे तसेच 'द्', 'ध', व 'य' या तीन व्यंजनांचे जोडाक्षर 'द्ध्य' असे आहे. प्रथम जोडाक्षरात फक्त दोन व्यंजने व दुस-यात तीन व्यंजने. अशा दोन्हीं जोडाक्षरांना संयुक्त वर्ण असेच म्हणतात.
- आघाताच्या नियमात संयुक्त वर्णाच्या प्रथम वर्णास द्वित्व करुन (त्या अक्षराची पुनरावृत्ती करुन) वाचतो. या प्रक्रियेत द्वित्व केल्यावर जर तो वर्ण वर्गातील दुसरा वर्ण असेल, तर द्वित्व केलेल्या वर्णातील पहिला वर्ण त्या वर्गातील प्रथम वर्णात परिवर्तन होतो. व समजा हा वर्ण चौथा असेल तर तिस-या वर्णात परिवर्तन होतो. समजा संयुक्त वर्णाचा प्रथम वर्ण त्या वर्गातील पहिला अथवा तिसरा वर्ण असेल तर तो आहे तसाच उच्चारला जातो व तसेच त्याचे द्वित्व होते. उदाहरणार्थ-

  - अक्षर = अ क् षर > अ क् क् षर = अक्क्षर
  - व्याख्या = व्या ख् या > व्या ख् ख् या > व्या क् ख् या = व्याक्ख्या
  - विद्धि = वि द् धि > वि द् द् धि = विद्द्धि
  - युध्यति = यु ध् यति > यु ध् ध् यति > यु द् ध् यति = युद्ध्यति

- काही ठिकाणी काही स्वरांनंतर संयुक्त वर्ण असूनही नियमाला अपवाद म्हणून आघात देण्यात आलेले नाहीत, जसे की, एकच वर्ण दोनदा आला असल्यास, तीन व्यंजने संयुक्त झाल्यास, रफार किंवा हकार आला असल्यास इत्यादी. ज्या स्थानी आघाताचे चिन्ह नसेल तिथे आघाता शिवाय म्हणावे.

  **# लक्षात ठेवा की, संयुक्त वर्णात प्रथम वर्ण, ' वर्ण वर्गांतील सुरुवातीच्या चार वर्णांहून निराळा' असल्यास संयुक्त वर्णातील प्रथम वर्णाचेच द्वित्व होते**


गीता परिवार चे साहित्य इतर कोणत्याही ठिकाणी वापरण्यासाठी पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

# संधी-नियम

दोन वर्ण एकत्र आले असता संधी होते. समजा एकत्र आलेले वर्ण स्वर असतील तर त्या संधीला स्वरसंधी, एक व्यंजन असेल तर व्यंजन संधी, अनुस्वाराच्या जागी बदल होत असेल तर अनुस्वार संधी आणि विसर्गाचे जागी बदल होत असेल तर विसर्ग संधी म्हणतात. संधी झाल्यावर एकत्र येणा-या वर्णांपैकी कोणत्याही एका किंवा कित्येक वेळेस दोन्ही वर्णांत बदल होतो. ते परिवर्तन कोणते व ते कसे होते हे आपण या नियमांतून समजून घेऊया.

## विसर्ग संधि

विसर्ग संधि विसर्गाच्या अगोदर आणि नंतरच्या त्या त्या वर्णाच्या आधारे होत असते. म्हणूनच विसर्गाच्या बाबतीत जेवढी परिवर्तने होतात त्यात अगोदरच्या व नंतरच्या वर्णांची फारच महत्वाची भुमिका असते.

1. समजा, विसर्गाच्या अगोदर पूर्ण वर्ण **'अ'** असेल व नंतरचा वर्ण ही **'अ'** अथवा कोणताही **मृदु वर्ण** (जसे की ग, घ, ज, झ, ड, ढ, द, ध, ब, भ, य, र, ल, व, ह, हे सर्व अनुनासिक) आहेत त्याचे विसर्ग आणि अगोदरच्या वर्णात परिवर्तन होत त्याजागी **'ओ'** असा उच्चार होतो.

   **# लक्षात असू की, विसर्गोपरात वर्ण 'अ' असेल तर विसर्ग व त्याचे अगोदरचा अकार च्या जागी 'ओकार' केल्यावर अकाराचा 'अवग्रह' (S) असा परिवर्तन होतो. याचा अर्थ तो दिसत नाही मात्र त्या जागी अवग्रह येतो.**

| पूर्ववर्ण | विसर्ग | नंतरचावर्ण | विसर्गाचे परिवर्तित रूप | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| अ | : | अ/मृदुव्यञ्जन | ओ/ओऽ | **दर्प:+अभिमानश्च = दर्पोऽभिमानश्च** (16/4)<br>**चेत्सुदुराचार:+भजते = चेत्सुदुराचारो भजते**(9/30) |

2. जर विसर्गा अगोदर **'अ'** हा स्वर असेल तर व नंतर **अकारा व्यतिरिक्त** कोणताही स्वर असेल तो विसर्ग लोप पावतो.
   **# लक्षात ठेवा की, हा नियम अव्यया च्या बाबतीत लागू होत नाही. या साठी 5 वा नियम पहावा.**

| पूर्ववर्ण | विसर्ग | नंतरचा वर्ण | विसर्गाचे परिवर्तित रूप | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| अ | : | अ काराहून वेगळाच स्वर | लोप | **मन:+आधत्स्व = मन आधत्स्व** (12/8) |

3. जर विसर्गा पूर्वी **'आ'** स्वर असेल व नंतर कोणताही स्वर असेल अथवा **मृदु व्यञ्जन** असेल तर विसर्ग लोप पावतो. (काही पारंपरिकते नुसार या नियमानुसार केला गेलेला विसर्गाचा लोप जर यति च्या जागेवर येत असेल तर त्याचा उच्चार केला जातो.

   **# लक्षात ठेवा की, वर सांगितलेल्या दोन्ही नियमांत झालेले विसर्ग लोप पावल्यानंतर काही स्वरांत कोणतीच संधी होत नाही.**

| अगोदरचा वर्ण | विसर्ग | नंतरचा वर्ण | विसर्ग का परिवर्तित रूप | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| आ | : | कोणताही स्वर/मृदुव्यञ्जन | लोप | **माययापहृतज्ञाना:+आसुरम् = मायायापहृतज्ञाना आसुरम्**(7/15) |


गीता परिवार चे साहित्य इतर कोणत्याही ठिकाणी वापरण्यासाठी पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

4. जर विसर्गा अगोदर **'अ'** आणि **'आ' व्यतिरिक्त** स्वर असेल व तद्नंतर **कोणताही स्वर** असेल अथवा कोणतेही **मृदुव्यञ्जन** येत असेल तर विसर्ग **'र'** मधे परिवर्तित होतो. अशा प्रकारे आलेला विसर्ग त्याच्या परिवर्ति स्वरात मिसळून जातो. आणि व्यंजन असेल तर त्या व्यंजनावर रेफ खूण दाखवली जाते.

| अगोदरचा वर्ण | विसर्ग | नंतरचावर्ण | विसर्ग का परिवर्तित रूप | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| 'अ'/'आ' व्यतिरिक्त स्वर | : | कोणतेही स्वर/मृदुव्यञ्जन | र् | **दुः + निरीक्ष्यम् = दुर्निरीक्ष्यम्** (11/17) |

5. **अव्ययात** असलेल्या विसर्गाच्या पूर्वी **कोणताही स्वर** असेल व तद्नंतर **कोणताही स्वर** अथवा **रेफ व्यतिरिक्त मृदु वर्ण** येत असेल तर विसर्गाचा **'र्'** च होतो.

| अगोदरचा वर्ण | विसर्ग | नंतरचा वर्ण | विसर्ग का परिवर्तित रूप | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| कोणताही स्वर | : | कोणतेही स्वर/मृदुव्यञ्जन | र् | **पुनः + जन्म = पुनर्जन्म** (8/16) |

6. विसर्गाच्या पूर्वी **कोणताही स्वर** व तद्नंतर **'च्'** अथवा **'छ'** वर्ण येत असेल तर विसर्ग **'श्'** मधे परिवर्तित होतो. **'ट्'** अथवा **'ठ'** वर्ण आला तर **'ष'** व **'त्'** व **'थ'** वर्ण आले असता **'स'** मधे परिवर्तित होतात.

| अगोदर चा वर्ण | विसर्ग | नंतरचा वर्ण | विसर्गाचे परिवर्तित रूप | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| कोणताही स्वर | : | च् / छ् | श् | **योगिनः + चैनम् = योगिनश्चैनम्** (15/11) |
| | | ट् / ठ् | ष् | **धनुः + टङ्कार = धनुष्टङ्कार** |
| | | त् / थ् | स् | **हन्युः + तन्मे = हन्युस्तन्मे** (1/46) |

7. जर विसर्ग नंतर **'क्'** अथवा **'ख'** हे वर्ण येत असतील तर त्या विसर्गाचा उच्चार **'ख'** अशा प्रकारे होईल.
**#ध्यान रहे उच्चारण ' ख् ' की तरह करना है ' ख्' नहीं।**

| अगोदरचा वर्ण | विसर्ग | उत्तरवर्ण | विसर्गाचे परिवर्तित रूप | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| कोणाताही स्वर | : | क् / ख् | ख् चा आवाज | **मैत्रः + करुण - मैत्रः(ख्) करुण** (12/13) |

8. जर विसर्ग नंतर **'प्'** अथवा **'फ'** हा वर्ण येत असेल तर त्या वर्णाचा उच्चार **'फ'** असा करावा.
**#ध्यान रहे उच्चारण 'फ्' की तरह करना है 'फ' नहीं।**

| अगोदरचा वर्ण | विसर्ग | नंतरचा वर्ण | विसर्गाचे परिवर्तित रूप | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| कोणताही स्वर | : | प् / फ् | फ् की ध्वनि | **ततः + पदम् = ततः(फ्) पदम्** (15/4) |

|| इति ||


गीता परिवार चे साहित्य इतर कोणत्याही ठिकाणी वापरण्यासाठी पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.